॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी दि. १५ – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विज्ञान शाखेतील तृतीय वर्षातील सर्व विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनींना 'डॉ. दिनेश सिताराम पाटील यांच्या नावे सुवर्णपदक' प्रदान करण्यात येणार आहे.

शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने गोजेरे (ता. भुसावळ) येथील सुनील सीताराम पाटील यांनी डॉ. दिनेश सिताराम पाटील यांच्या नावे सुवर्ण पदकासाठी देणगी दिली आहे. हे सुवर्णपदक सुरु झाल्यामुळे विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींमध्ये अभ्यासाची प्रेरणा निर्माण होणार असून गुणवंत विद्यार्थिनींचा सन्मान करण्याची ही एक आदर्श परंपरा ठरेल, असा विश्वास कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांनी व्यक्त करत विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळावी आणि महिला विद्यार्थिनींना स्पर्धात्मक वातावरणात प्रोत्साहन मिळावे यासाठी या सुवर्णपदकाचा उपयोग होईल. शिक्षण क्षेत्रातील अशी देणगी प्रेरणादायी असून यामुळे इतर दानशूर व्यक्तींनाही शैक्षणिक क्षेत्रात योगदान देण्याची प्रेरणा मिळेल असे म्हटले आहे.

यावेळी माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील, प्र. कुलगुरू प्रा. एस.टी इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रा. योगेश पाटील व सी. ए. रवींद्र पाटील उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव प्रतिनिधी दि. १५ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यात आज दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत विद्यापीठातील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतना संदर्भात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (MoU) करण्यात आला.

या सामंजस्य करारामुळे विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सुविधा उपलब्ध होणार आहेत. विशेषतः विमा संरक्षणासह कर्मचारी कल्याणाशी निगडित बाबींना अधिक बळ मिळणार आहे. यामुळे कर्मचारी वर्गामध्ये समाधानाची भावना निर्माण होईल, असा विश्वास यावेळी कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी व्यक्त केला आहे.

या करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. विनोद पाटील आणि बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे झोनल मॅनेजर श्री. प्रवीणकुमार सिंग यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरु प्रा. डॉ. एस.टी. इंगळे, वित्त व लेखा अधिकारी सीए. रविंद्र एन. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य व आर.सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूरचे प्राचार्य डॉ. संजय जे. सुराणा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल पी. डोंगरे तसेच बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे नियोजन अधिकारी श्री. विक्रम गिते व शाखाधिकारी श्री. अभिनव आर्या आदी उपस्थित होते.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १५ सप्टेंबर, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. (१५) - कवयित्री वहिणावाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे प्राध्यापक प्रवोधिनी अंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचाालक प्रा. आशुतोप पााटील यांनी "शिकाव कशासाठी" या विषयावर प्रशाळेतील शिक्षक तसेच विद्यार्थ्यांवरोवर संवाद साधला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे उपस्थित होते.

यावेळी वोलतांना प्रा. आशुतोष पाटील म्हणाले की, प्राचीन काळात जी विद्या एका विशिष्ट वर्गापुरती मर्यादित होती. याला छेद देत नंतर मध्ययुगीन काळात महानुभव आणि वारकरी सांप्रदायांच्या माध्यमातून सर्वाभूती समानतेचा संदेश देणारे ज्ञान हे सर्वासाठी भक्ती मार्गाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. ब्रिटिशांच्या आगमनानंतर मात्र आधुनिक शिक्षणाने वर्ण व्यवस्थेकडे चिकीत्सक दृष्टीने पाहायला शिकवले. आधुनिक शिक्षणानंतर विद्येची पारंपारिक मक्तेदारी मोडीत निघून धर्मग्रंथांच्या चिकीत्सक अभ्यासाला सुरूवात झाल्याने समाजात शैक्षणिक क्रांतीला सुरूवात झाल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक खेमराज पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रांजली जोशी तर आभार डॉ. सुदर्शन भवरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रशाळेतील प्राध्यापक डॉ. प्रीती सोनी डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. दीपक खरात, कृष्णा संदानशिव, भारती सोनवणे प्रतिभा गलवाडे, स्नेहा गायकवाड, प्रीती मनुचारी, नेहा लाम्हणे संशोधक, महेश सूर्यवंशी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव दि. (१५) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळेतर्फे पी.एम. उषा योजनेअंतर्गत "बोध : मानवी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता" (Cognition: Human and Artificial Intelligence) या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात येणार आहे. या परिषदेच्या निमित्ताने विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते माहितीपत्रकाचे विमोचन करण्यात आले.

यावेळी प्र. कुलगुरु प्रा. एस. टी इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संगणक शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. आर. जे. रामटेके, प्रा. अजय पाटील, प्रा. राम भावसार यांच्यासह विविध प्रशाळेतील प्राध्यापक उपस्थित होते. ही परिषद दि.२३ व २४ जानेवारी २०२६ मध्ये होणार असून देश-विदेशातील नामवंत तज्ज्ञ, संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत. या परिषदेत विविध तांत्रिक सत्रे, पेपर प्रेझेंटेशन सादर करण्यात येणार आहे. उत्कृष्ट पेपर सादरीकरणासाठी पारितोषिक देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष समिती गठीत करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी https/nmu.ac.in/en-us/CHAI-2026 या संकेतस्थळाला भेट द्यावी. नोंदणी प्रक्रिया सुरू असून संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक यांनी संशोधन पेपर दि.२० नोव्हेंबर २०२५ पर्यंत पाठवावे असे आवाहन करण्यात आले आहे.

........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ — दिनांक: १५ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता